जा.क्र.उमा२/कोवि/१७-१८/सूचना/१०६१९-२९
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
विभाग, कोल्हापूर
दिनांक- ६/५/२०१७

प्रति,

प्राचार्य/ मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त अनुदानित/अंशतः अनुदानित/ विनाअनुदानित/
कायम विनाअनुदानित/ स्वंयअर्थसहाय्यित शाळा, कोल्हापूर विभाग,

**विषय -उच्च माध्यमिक शाळासाठी सूचना २०१७-१८**
**संदर्भ-१) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय दि. ६/५/१९७६, ६/२/२०१२, १९/७/२०१४, म.खा.शाळा कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ व प्रचलित सर्व तदनुषंगिक शासन निर्णय**

विभागातील सर्व उच्च माध्यमिक शाळांसाठी खालीलप्रमाणे सूचना देणेत येत आहेत. सदर सूचना व त्याबाबत दिलेले शासन निर्णय अवलोकनी घ्यावेत. व दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. याबाबत या कार्यालयाडून वेळोवेळी सूचना देणेत आलेल्या आहेत. तथापि काही शाळा या सूचनांचे पालन करीत नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. ज्या शाळा दिलेल्या सूचनांचे पालन करणार नाही अशा शाळांचे मुख्याध्यापक/ उपप्राचार्य/उपमुख्याध्यापक (उच्च माध्यमिक) यांचेवर महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी ( सेवेच्या शर्ती ) नियमावली १९८१ मधील तरतूदी व या संदर्भातील शासन निर्णयानुसार कारवाई करणेत येईल तसेच मान्यता दिलेल्या वर्ग/ तुकडया परवानगी आदेशातील अटी/शर्तीचे पालन करीत नसलेने सदर वर्ग/तुकडयांची मान्यता काढून घेणेबाबतची कार्यवाही सुरु करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१) **मागासवर्ग आरक्षण-** या कार्यालयाकडे प्राप्त होणारे वैयक्तिक मान्यतेचे प्रस्तावांची छाननी करताना असे निदर्शनास येते की, काही संस्था/ शाळा मागासवर्ग आरक्षण कायदा २००४ व या संदर्भातील शासन निर्णय यांचे पालन न करता कर्मचारी नियुक्त करुन त्यांचे मान्यतेचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करीत आहेत. मागासवर्ग आरक्षण कायदयानुसार तसेच शासन निर्णय दिनांक ५/११/२००९ नुसार आरक्षण डावलून नियुक्ती दिल्यास नियुक्ती प्राधिकारी यांना ६ महिने कारावास व ५०००/- दंडाची तरतूद करणेत आलेली आहे. यामुळे शासन निर्णय दि. ५/११/२००९ मधील तरतूदीनुसार प्रत्येक भरतीपूर्वी मागासवर्ग आरक्षण नोंदवही सहाय्यक आयुक्त मागासवर्ग आरक्षण कक्ष यांचेकडून तपासून घेणे व त्यानुसारच नियुक्ती देणे आवश्यक आहे. वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव सादर करीत असताना मागासवर्ग कक्षाने तपासलेली अद्ययावत नोंदवही व गोषवारा प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक आहे. आरक्षण नसताना नियुक्ती दिलेली असल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

२) **मान्यताप्राप्त शिक्षक/कर्मचारी यांचे जात वैधताप्रमाणपत्र-** शासन निर्णय दिनांक १८/५/२०१३ नुसार प्रत्येक मागासवर्गीय कर्मचा-याचे जात वैधता प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. सबब, आपल्या आस्थापनेवरील मान्यताप्राप्त सर्व पूर्णवेळ मागासवर्गीय शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे जात वैधताप्रमापणपत्र आहे याची खातरजमा करुन घेणेत यावी. जर जात

वैधताप्रमापणपत्र नसेल तर तात्काळ ते प्राप्त करुन घेणेबाबत संबंधित कर्मचारी यांना नोटीस देणेत यावी. सदर सर्व मागासवर्गीय कर्मचारी यांची जात वैधताप्रमाणपत्रे सन २०१७-१८ च्या संच मान्यतेवेळी सादर करावीत. ज्या मागासवर्गीय कर्मचा-यांची जात वैधताप्रमाणपत्रे असणार नाहीत त्यांचे मान्यतेबाबत फेरविचार करणेत येईल याची नोंद घ्यावी.

३) **विनापरवानगी पद भरतीबाबत-** शासन निर्णय दि. ६/२/२०१२ नुसार पदभरतीबाबत करावयाची कार्यवाहीचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही होणे अपेक्षित असताना याचे पालन संबंधित संस्था/ शाळा यांचेकडून होत नाही असे निदर्शनास येते . शासन निर्णय दि. २/५/२०१२ नुसार अनुदानित कडे पदभरतीस निर्बंध घालणेत आलेले होते. शासन निर्णय दि. १९/७/२०१४ नुसार मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील समितीने पद भरतीस परवानगी दिलेशिवाय कोणत्याही परिस्थतीत अनुदानित व विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळामधील पूर्णवेळ, अर्धवेळ, रजा कालावधीतील शिक्षक/ शिक्षकेतर पदांची पद भरती करता येत नाही. तथापि काही संस्था/ शाळा या कार्यालयाचे पूर्वपरवानगी शिवाय अशी पदभरतीबाबतची जाहीरात प्रसिध्द करीत आहेत. अशा पदावर नियुक्त कर्मचा-यांना मान्यता दिल्या जाणार नाहीत तसेच संबंधित शाळांनी असे वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेस अशा प्राचार्य/ मुख्याध्यापक यांचेवर योग्य ती कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

४) **उच्च माध्यमिक शाळा प्रवेशाबाबत-** सन २०१७-१८ मध्ये इ. ११ वी मध्ये प्रवेश देताना मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जादा प्रवेश देणेत येवू नयेत. परिसरातील प्रवेश क्षमता पूर्ण झाली असेल अथवा १० कि.मी. परिसरात विदयार्थ्यांची शैक्षणिक सोय होत नसेल तर मंजूर वर्ग/तुकडया मध्ये जादा प्रवेश दयावयाचे असल्यास कोल्हापूर जिल्हा वगळता अन्य जिल्हयामध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची परवानगी घ्यावी. कोल्हापूर जिल्हयातील (कोल्हापूर शहरासह) उच्च माध्यमिक शाळांनी असे प्रस्ताव/माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे सादर करावी. मंजूर क्षमतेपेक्षा जादा दिलेले प्रवेश योग्य नसल्यास नियमबाहय पध्दतीने दिलेले असल्यास असे प्रवेश रद्द करणेत येतील असे अमान्य विदयार्थी संख्या संच मान्यतेमध्ये कार्यभारासाठी विचारात घेतली जाणार नाही. तसेच अशा विदयार्थ्यांची संख्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळास (एचएससी बोर्ड) कळविणेत येईल व त्यामुळे विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य/मुख्याध्यापक यांची राहील.

५) **इयत्ता ११ वी प्रवेशाबाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचे दिनांक ४/३/२०१७ चे पत्र पहावे. सदरचे पत्रात दिलेल्या सूचनानुसार इ. ११ वी प्रवेशाबाबत कार्यवाही करणे आवश्यक राहील. सदरचे पत्र या कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आलेले आहे.**

६) **कार्यभाराबाबत-** शासन निर्णय दि. २४/०२/२००९ व सदर शासन निर्णयातील संदर्भाधीन शासन निर्णय अवलोकनी घ्यावेत. सदर शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे विदयार्थी पटसंख्येनुसार कार्यभार देणे व त्यानुसार पद निश्चिती होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन २०१७-१८ च्या विदयार्थी प्रवेशानुसार विषयनिहाय कार्यभार निश्चिती करणेत यावी. तसेच यानुसार मंजूर पदावर मान्यताप्राप्त शिक्षक कार्यरत राहतील. मंजूर पदापेक्षा जादा पदे झाल्यास ती शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे. शासन मान्यतेनंतरच सदरच्या वाढीव पदावर नियुक्ती करता येईल. कार्यभार कमी झालेने मंजूर पदे कमी होत असल्यास व अशा मंजूर पदावर मान्यताप्राप्त पूर्णवेळ कायम शिक्षक कार्यरत असल्यास अशा

शिक्षकांचे तात्काळ संस्था स्तरावर समायोजन करणेत यावे. संस्थास्तरावर असे समायोजन होत नसल्यास अशा शिक्षकांची नावे  या कार्यालयास तात्काळ सादर करावीत. याबाबत मुददा क्र. ११ वाचावा.

७) मंजूर शाखा/तुकडयामध्ये एकापेक्षा जादा तुकडया असल्यास एखादया विशिष्ट वैकल्पिक विषय घेणा-या वेगवेगळया तुकडयातील विदयार्थ्यांची संख्या एका वर्गात सामावून घेण्याइतकीच असेल तर तो एकच वर्ग आहे असे समजून कार्यभार निश्चित केला जाईल.

सन २०१५-१६ व २०१६-१७ च्या संच मान्यतांचे अवलोकन केले असता, विभागातील कला शाखेकडील पट सातत्याने कमी होत असलेचे निदर्शनास आलेले आहे. यामुळे कला शाखेकडील तुकडया पटाअभावी बंद पडत असून यामध्ये मंजूर शिक्षक संख्या कमी होत असलेचे निदर्शनास आले आहे. यामुळे कला शाखेकडील विषयवार पटसंख्या विचारात घेवून आवश्यकतेपेक्षा जादा विषय सुरु असल्यास असे विषय कमी करणेत यावेत. शक्यतो अनिवार्य २ विषय (भाषा विषय) व वैकल्पिक ४ विषय सुरु राहतील असे पहावे. जेणे करुन पटसंख्येच्या प्रमाणात विषय व कार्यभार मंजूर होवून निकषानुसार मंजूर पदे कायम राहतील व अनावश्यक व रिक्त असलेली पदे कमी होवून अतिरिक्त शिक्षकांचा प्रश्न उदभवणार नाही याची दक्षता घ्यावी.

८) माध्यमिक शाळा संलग्न उच्च माध्यमिक शाळेसाठी कार्यभार तक्त्यामध्ये एका वर्गाच्या दोन किंवा दोनपेक्षा जास्त तुकडया मंजूर असतील तर कनिष्ठ महाविद्यालयाने पहिल्या तुकडीत पूर्ण क्षमतेची विद्यार्थी संख्या व उर्वरीत विद्यार्थी संख्या दुसऱ्या तुकडीत दर्शवावी. उदा. इ. ११ वी कलेच्या २ तुकडया व एकूण विदयार्थी संख्या ११४ असल्यास इ.११ वी कला अ तुकडी- विदयार्थी संख्या ८०, ब तुकडी विदयार्थी संख्या ३४ या प्रमाणे वर्ग व तुकडया विदयार्थी संख्या दर्शवावी. वरिष्ठ महाविदयालयासाठी प्रथम तुकडीमध्ये १२० प्रमाणे पटसंख्या निर्धारीत करावी.

९) **पायाभूत पदे-** शासन निर्णय दि. २६/०२/२००२ नुसार सन २००१-०२ च्या संच मान्यतेनुसार मंजूर असणारी सर्व पदे पायाभूत पदे आहेत. पायाभूत पदामध्ये शासन परवानगी शिवाय वाढ केली जाणार नाही अथवा यामध्ये परस्पर बदल केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी. पायाभूत मंजूर पदावर नियुक्ती करताना शासन निर्णय दि. ०६/०२/२०१२, ०२/०५/२०१२, १९/०७/२०१४ मधील शासन निर्णयाचे पालन करावे.

१०) **वाढीव मंजूर पदे-** सन २००१-०२ नंतर विविध कारणाने वाढीव झालेल्या पदांचे प्रस्ताव शासनाकडे सादर होवून उच्च माध्यमिककडील पूर्णवेळ व अर्धवेळ पदाना विविध शासन निर्णयानुसार मंजूर देणेत आलेली आहे. सदरची वाढीव मंजूर पदे सध्या पायाभूत पदामध्ये समाविष्ट केलेली आहेत. सदयस्थितीत २०१०-११ पर्यंतची उच्च माध्यमिकची पदे शासनाकडून मंजूर करणेत आलेली आहेत.

११) प्रस्तावित पदे २०११-१२ ते २०१३-१४ सदरची पदे शासनाकडे प्रस्तावित असून ही पदे अदयाप मंजूर नसलेने या पदावरील नियुक्त्या व त्यांचे मान्यता या अमान्य करणेत आलेल्या आहेत. शासनाकडून सदर प्रस्तावित पदाबाबत जो निर्णय होईल तो संबंधित शाळाना कळविणेत येईल. शासन आदेशानुसार याबाबत योग्य ती कार्यवाही करणेत येईल.

१२) **सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ च्या वाढीव प्रस्तावित पदाबाबत-** सन २०१४-१५ ते २०१६-१७ मधील कोणतीही वाढीव पदे शासनाकडे प्रस्तावित करणेत आलेली नाहीत तसेच प्रस्तावित केली जाणार नाहीत. सन २०१७-१८ मध्ये याबाबत शासनाकडून देण्यात येणा-या

आदेशानुसार कार्यवाही करणेत येईल. सदयस्थितीत सन २०१३-१४ च्या पायाभूत मंजूर पदे व शा.नि. दि. २१/५/२०१४ व २६/११/२०१४ नुसार वाढीव मंजूर पदानुसार पदांचा विचार करणेत आलेला आहे. या शिवाय सन २०१४-१५ ते २०१६-१७ च्या अनुदानितच्या संच मान्यतेमध्ये पायाभूत पदापेक्षा जास्त वाढलेली नाहीत याची दक्षता घ्यावी. मंजूर नसलेली कोणतीही पदे ग्राहय धरली जाणार नाहीत. तसेच मंजूर नसलेल्या पदावर कोणत्याही परिस्थितीत नियुक्त्या करता येणार नाहीत व असे प्रस्ताव कार्यालयाकडे सादर करणेत येवू नयेत.

१३) **सन २०१७-१८ ची सांख्यिकी माहितीबाबत-** आपल्या उच्च माध्यमिक शाळेची सन २०१७-१८ ची सांख्यिकी माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांचे कार्यालयातील सहा. शिक्षण उपनिरिक्षक (उच्च माध्यमिक) यांचेकडे सप्टेंबर २०१७ मध्ये जमा करणेत यावी.

१४) संच मान्यतेबाबत- सन २०१६-१७ पर्यंतच्या संच मान्यता अनुदानित , विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, स्वंय अर्थ सहाय्यित कनिष्ठ महाविदयालये कडील पूर्ण झालेल्या असून अदयापी ज्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविदयालये यांनी संच मान्यता फाईल कार्यालयाकडे सादर केलेल्या नसतील त्यांनी संस्थेच्या विलंबाच्या खुलाशासह त्वरीत संच मान्यता प्रस्ताव सादर करुन पूर्ण करुन घ्याव्यात. जून २०१७ नंतर २०१६-१७ पूर्वीच्या कोणत्याही संच मान्यता करुन दिल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१५) संच मान्यता नेलेल्या नसतील त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधून घेवून जाव्यात. सन २०१५-१६ च्या विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित शाळांची संच मान्यता लवकरच या कार्यालयाचे वेबसाईटवर भरणेसाठी उपलब्ध करुन देणेत येईल त्याप्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी. संच मान्यतेमध्ये कार्यभारानुसार देय ठरणारी पदे व पायाभूत मंजूर पदे ( वाढीव मंजूर पदासह) यांचा समावेश आहे. पद पायाभूत/वाढीव मंजूर नसल्यास अशी अनुदानित कार्याभारावरील पदे शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्तावित केली जातात.

१६) **संच मान्यता दिलेल्या वेळापत्रकानुसार विहित कालावधीत करुन घेण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/ प्राचार्य यांची राहील. विहित कालावधीत संच मान्यता माहिती सादर न केल्यास होणा-या सर्व नुकसानीची जबाबदारी प्राचार्य/ मुख्याध्यापक यांची राहील तसेच विलंबाने प्राप्त संच मान्यता केल्या जाणार नाहीत याची गांभीर्याने नोंद घ्यावी. अनुदानित शाळांनी वेळेत सादर न केलेल्या संच मान्यतेमुळे वेतन रोखणेत आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील**.

१७) वैयक्तिक मान्यतेबाबत- वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव सादर करीत असताना या कार्यालयाकडून देणेत येत असलेल्या परिपत्रकानुसार परिपूर्ण प्रस्ताव तयार करुन चेकलिस्ट व पेजींग करुन सादर करावेत. परिपत्रकामधील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. या संदर्भात शासन निर्णय दि. ६/२/२०१२, २/५/२०१२, १९/७/२०१४, १३/१०/२०००, १०/६/२००५ इ. अवलोकन करणेत यावे. वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव सादर करीत असताना विशेष जाहीरात मूळ कात्रण, मागासवर्ग कक्षाकडील अदयावत मागासवर्ग आरक्षण गोषवारा असण् आवश्यक आहे. सदरचा गोषवारा २ वर्षाचे आतील असावा.

१८) **प्रथम मान्यता व नैसर्गिक वाढ मान्यतेबाबत-** शासनाकडून परवानगी प्राप्त झालेल्या विनाअनुदानित /कायम विनाअनुदानित/ स्वंयअर्थसहाय्यित शाळा मधील वर्ग/अतिरिक्त शाखा/ तुकडया यांचे इ. ११ वी व इ. १२ वी प्रथम मान्यतेचे प्रस्ताव या कार्यालयाचे वेबसाईटवर देणेत आलेल्या विहित चेकलिस्टनुसार व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे

तपासणी अहवालानुसार सादर करणेत यावेत. सदरचे प्रस्ताव वेळेत सादर होणे आवश्यक आहे. अन्यथा इ १२ वी परीक्षेस बसण्यास विदयार्थ्यांची अडचण निर्माण होते व विदयार्थी व शाळा यांचे शैक्षणिक/ आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. यामुळे विहित कालावधीत परिपूर्ण प्रस्ताव सादर होतील याची दक्षता घ्यावी.

१९) **अनधिकृत शाळा/ वर्ग/ तुकडयाबाबत**- शासन परवानगी शिवाय अनधिकृत वर्ग/तुकडया सुरु करु नयेत. अशा वर्ग/तुकडयामधील विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. शासन परवानगी पासून १८ महिन्यात शाळा/वर्ग/ तुकडया सुरु करणे आवश्यक असते. १८ महिन्यात सदर शाळा/वर्ग/तुकडया सुरु झाल्या नाहीत तर असे शासन परवानगीचे आदेश आपोआप रद्द होतात. यामुळे १८ महिन्यानंतर असे वर्ग/तुकडया सुरु करु नयेत.

२०)**२०१७-१८ मध्ये वाढीव अतिरिक्त शाखा /तुकडयाबाबत**- सन २०१७-१८ मध्ये शासनाकडून विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/ स्वंयअर्थसहाय्यित तत्वावरील वाढीव अतिरिक्त शाखा/ तुकडया यांचे प्रस्ताव मागणी करणेत आलेस त्यानुसारच्या सूचना या कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील. तथापि, अशा जादा तुकडया / अतिरिक्त शाखेमध्ये जादा प्रवेश देणेपूर्वी या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.

२१)**अनुदानित/विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळामध्ये वाढीव विषयास परवानगी बाबत**- शिक्षण संचालनालयाकडील पत्र दिनांक ०७ जानेवारी २०१६ अनुदानित शाळाकडे तसेच विनाअनुदानित शाळाकडे वाढीव विषयास या कार्यालयाचे स्तरावरुन परवानगी देणेत येवू नये असे आदेश आहेत. वाढीव विषयास परवानगी बाबतचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे शिफारसीसह या कार्यालयास प्राप्त झालेनंतर या कार्यालयाचे अभिप्रायासह शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे यांचेकडे सादर करणेत येतील. सदयस्थितीत कोणत्याही उच्च माध्यमिक शाळामध्ये मूळ परवानगी दिलेल्या विषयाशिवास अन्य कोणतेही वाढीव विषय सुरु करु नयेत. विषय परवानगी शिवाय विदयार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

सदरचे परिपत्रक संस्थाचालकांचे निदर्शनास आणणेत यावे.

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव सविनय सादर

मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन मुंबई ३२

मा. आयुक्त, शिक्षण , महाराष्ट्र राज्य, बालभारती सेनापती बापट मार्ग, पुणे

मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे

विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर/ रत्नागिरी यांना समादराने

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी-

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर /सांगली/ सातारा/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग